म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय नाटक
दा. क्र. १५८०

श्री.

सोडत.

१५८०

आधारानें

संग्रहालय, ठाणे.
वाचनालय/नौपाडा.
१७७
सं. क्र.

विघ्नसंतोषी आणि

नाटक

म. ग्रं.

विषय नाटक

लेखक

ग्रंथालय क्रमांक

पुस्तक

संग्रहालय,

श्री.

# विघ्नसंतोषी आणि सोडत.

हें प्रहसन

एका इंग्रजी पुस्तकाच्या आधारानें

केलें तें

कर्त्याच्या परवानगीनें


ल. वि. खळे आणि मंडळी

बुकसेलर्स आणि पब्लीशर्स, बडोदें,

यांनीं

छापविलें.



( सर्व हक्क कर्त्यानें राखले आ

( सन १८६७ च्या २५ व्या कायद्याप्रमाणें हे



सन १८९०.

आमदाबाद—"आर्योदय,"
आणि
बडोदें—"वीरक्षेत्रमुद्रालय" यांत छापिलें.

# प्रस्तावना.

बुदबळें व दशावतारी गंजिफा ह्यांचा खेळ जरी सर्व खेळांत श्रेष्ट, व ह्यांपासून जरी मोठी करमणूक होते, तरी त्या खेळांचा परिणाम लवकर होत नसल्यामुळें त्यांचा कंटाळा येऊन, चौकटी गंजिफा किंवा बिजिक वगैरे लवकर आटोपणारे खेळ खेळावे, असें पुष्कळांस वाटतें. त्या प्रमाणेंच मोठीं नाटकें किंवा कादंबऱ्या ह्यांपासून जरी मनाचें रंजन होतें, तरी तीं वाचण्यास फार वेळ लागत असल्यामुळें, लहानसें पुस्तक वाचण्याविषयीं पुष्कळांची प्रवृत्ति होते. त्यांत दुःखपर्यवसायी नाटक किंवा कादंबरी हीं मनाचें स्थैर्य करून वाचावीं लागतात त्यांचा झालेला परिणाम मनावर जरी फार वेळ राहतो, व त्यापासून एकंदरींत जरी जास्ती फायदे होतात, तरी कामकाज करून त्रासलेल्या मनास अशीं पुस्तकें वाचण्याचा कंटाळा येतो. त्या वेळीं लहानसें चटकदार प्रहसन वाचण्यास मिळालें तर मन सुप्रसन्न होतें. मराठी भाषेंत अशीं प्रहसनें अलीकडेस बरींच झालीं आहेत. परंतु त्यांत बहुत करून नवीन सुधारा, लोक विशेषांच्या रीतिभाती, किंवा विरुद्धपक्षांचीं मतें,

ह्यांवर कटाक्ष धरलेला असतो. फ्रेंच किंवा इंग्रजी भाषेंत सर्व साधारण विषयांवर झालेल्या प्रहसनाप्रमाणें, आपल्या भाषेंत फारशीं प्रहसनें नाहींत. त्या धोरणावर व त्यांच्या आधारानें, कांहीं प्रहसनें मराठी भाषेंत लिहावींत, असें एके दिवशीं मनांत येऊन हें प्रहसन लिहिलें. परंतु हें लिहून झाल्यावर, मूळ ज्या प्रहसनाच्या आधारानें हें लिहिलें, त्यांतलि गोडी आणि रहस्य ह्यांत उतरलीं नाहींत असें वाटून, हें बरेच दिवस एकीकडेस टाकलें होतें. तें पुढें दोन तीन रसिकांच्या वाचण्यांत येऊन त्यांनीं छापण्या विषयीं सुचविल्यावरून, व एका पुस्तकें विकणारांच्या होतकरू मंडळीनें तें छापण्याविषयीं परवानगी मागितल्यावरून, तीस हें छापून प्रसिद्ध करण्याची परवानगी दिली आहे.

पुस्तक कर्ता.

# पात्रें.

रामजी दादा........ एका तालुक्याचे गांवचा वकील.

पार्वती बाई.......... व्याजबट्ट्याचा धंदा करणारी एक मराठीण विधवा.

लक्ष्मी.......................... रामजी वकिलाची मोलकरीण.

वामन..................... रामजी वकिलाचा कारकून.

सगुणा.................. ... लक्ष्मीची आई.

नारायण................ गांवांतील एक तरुण मराठा.

श्री.

# विघ्नसंतोषी आणि सोडत.

## अंक १ ला.

स्थळ.—एका तालुक्याचे गांवांतील रामजी वकिलाचें घर. त्यास लागून पार्वतीबाईचें घर. दोनही घरांस एक अंगण, व त्यावर एक उन्हाळी मांडवा.

(रामजी, वामन, पार्वतीबाई, लक्ष्मी येतात. **रामजी** पार्वतीबाईच्या घरा शेजारच्या आपल्या घरांतील खोलींत पलंगावर डोळे चोळीत लोळतो. **वामन** ओटीवरील खोलींत कागद वाचीत बसतो. **लक्ष्मी** ओटी झाडते. **पार्वती** बाई आपल्या घराच्या ओटीवर येऊन उभी राहते.)

**पार्वती**—कायग लक्ष्मी, आटोपलें कां काम तुझें! आज तिसरे प्रहरीं मला विश्वेश्वरी जायचें आहे; तूं येशील कां माझ्या बरोबर!

(**लक्ष्मी** हातांत केरसुणी असतां पार्वतीबाईच्या ओटीवर जाते. त्यांचें चाललेलें भाषण **वामन** ओटीवरच्या खोलींत बसून कान देऊन ऐकतो. **रामजीस** सहजावृत्ती ऐकूं येते.)

लक्ष्मी—मला बाई कसें बनेल तुमच्या बरोबर यायला? जरा इकडे कां तिकडे झालें तर लागलेच ते शिव्या द्यायला लागतात. पहाटेपासून काम करतें, तरी सारा वेळ शिव्या देतात; आणि मेला एक रुपया महिन्याचा. वाढून देतात त्यावर पोटभर भाकरीसुद्धां घालीत नाहींत. तो भिवा कोठें चोरून मारून राहिलेलें कोरड्यास अधिक उणें देतो तों तो मेला कुबडा लागलाच त्यांना जाऊन सांगतो. वाईट, मेलें मोलकरणीचें काम भारी वाईट; मीं मेली मोलकरीण तर मोलकरीण, आणि पुनः हरकामी. सारीं कामें माझ्याकडे. मला कीं नाहीं कंटाळा आला आहे ह्या धंद्याचा. कायबाई करावें? गरीबी असली म्हणजे उपाय नाहींसा होतो. तुमच्या सारखे माझ्या आईजवळ दोन पैसे असते, तर कशाला पडत्या ह्या पंचायती?

पार्वतीबाई—अग वेडी आहेस तूं. कशाचे पैसेन् बियसे. आमचें दुःख आह्मांला माहीत.

लक्ष्मी—तुमच्यासारखी पार्वतीबाई, सुखी कोण आहे? तुमचे यजमान गेले खरे, पण त्यांनीं दोन पैसे तुम्हांला ठेवल्यानें व्याजबट्टयावर तुमचें आपलें बरें चाललें आहे.

पार्वतीबाई—लक्ष्मी, तुला माहीत नाहीं. खरें ह्मणशील तर आतां कोणत्याच धंद्यांत सुख नाहीं. अग,

व्याजाचे दोन पैसे येतात ते तुह्मांला दिसतात, पण जे मेल्यांचे शिव्या श्राप सोसावे लागतात ते काय सांगूं ! पैसे न्यायला येतात तेव्हां असे हातीं पायीं लागतात, पण परत मागायाला गेले कां उठली त्यांच्या कपाळाची शीर. व्याजबट्टयाच्या धंद्यासारखा मेला दुसरा वाईट धंदा नाहीं.

**वामन**—( आपल्या खोलींत हांसत ) हाः हाः, बरें झालें, मला वाटत होतें कां वकिलाच्या कारकुनाचा धंदा साऱ्यांत वाईट, चार चौघांचे गळे कापल्याशिवाय वकिलालाहि दोन पैसे मिळत नाहींत, आणि कारकुनाच्या हातीं कांहीं लागत नाहीं. गुलाम निवाडा होण्याच्या आधीं आडवून धरलें कां पटपटा पैसे काढतात; आणि निवाडा बुडाला कां लागले शिव्या श्राप द्यायला. ह्याला वकिलाचा कारकून काय करील ? वकिलाला काम चालवितां येत नाहीं, आणि पैसे मागितले ह्मणून कारकुनाला शिव्या. बरें असो. आपला धंदा वाईट त्यांत हरकत नाहीं, पण दुसऱ्यांचा चांगला नसला म्हणजे झालें. [ हांसत ] हाः हाः हाः, जरा पार्वतीबाईच्या ओटीवर जातों. दोघींचें रडें ऐकण्यासारखी दुसरी मजा नाहीं. पण समदुःखी होऊन त्या दोघींची गट्टी जमेल, तें मात्र बरें नाहीं. तें आपल्याला नाहीं आवडणार. लक्ष्मीला जाऊन बोलावूनच आणतों आतां.

[ **वामन पार्वतीबाईच्या** ओटीवर हळू हळू जातो, त्या दोघी चपापतात.]

**पार्वती**—कां वामनराव, आज सकाळींच तुह्मीं आलात घर सोडून?

**वामन**—सकाळीं न येऊं तर रामजी दादा शिव्या नाहीं देणार? आणि सकाळीं येतों तों हापिसाच्या खोलींतला लक्ष्मीनें कचरा सुद्धां काढला नाहीं; आणि इकडे येऊन गोष्टी सांगत उभी आहे. काम नाहीं झालें ह्मणजे शिव्या खाव्या लागतील मला.

( **रामजी** वकील उठून मोठ्यानें जांभळी देतो आणि **भिवास** हांक मारतो. ती त्या तिघांस ऐकूं येते. )

**लक्ष्मी**—उठले वाटते ते, चला जाऊं द्या आधीं.

**वामन**—चल चल, लवकर परत जाऊं, आतां येतील ओटीवर.

( **लक्ष्मी** आणि **वामन** परत जातात व आपआपल्या कामास लागतात. **पार्वतीबाई** घरांत जाते. व **रामजी** ओटीवर येतो. )

**रामजी**—काय बेटे हे! प्रत्येकजण असुखी! मला मोठें नवल वाटतें, कीं परमेश्वरानें जी स्थिति दिली आहे तींत ज्याचा त्याला संतोष कसा नसतो!! माझ्यासारखा ह्यांना त्रास असता तर कसें झालें असतें? वकिलासारखें दुःख कोणाला तरी आहे? [ खिशांतून डायरी काढून पाहतो ] तारीख १७ माहे मे सन १८८९

रोजीं टाकळीची सोडत निघणार होती, ह्मणजे आज पांच दिवस झाले. माझा नंबर निघाला असला तर ह्या वकिलीला रामरामच केला पाहिजे. ती आमची सनद साहेब लोकांच्या सैतानाकडे पाठवून देईन. तसें कशाला? त्यापेक्षां हायकोर्टाची हायकोर्टाकडे पाठवून दिली तर काय वाईट? आणि मग लग्न करून सुखानें संसार करावा. पण नाहीं, लग्न करून लागलीच पायांत बिडी कोण घालून घेतो? चार दिवस मुंबईस, चार दिवस पुण्यास राहून तेथें मजा मारूं. मग लग्नाच्या बंधनांत पडूं. [ पाठीमागें वळून हाक मारतो ] लक्ष्मी, अगे लक्ष्मी, कोठें गेली ही? अशीं सुस्त माणसें असलीं ह्मणजे भारी त्रास होतो.

( लक्ष्मी येते. )

**लक्ष्मी**—जी आलें.

**रामजी**—जी आलें! हाक मारीन तेव्हां कधीं येणार नाहींस, आणि काम नसेल तेव्हां येथें तयार. तूं हरकामी ना? हरकामीनें हरघडीस हरठिकाणीं असलें पाहिजे. इकडे तिकडे आणि चोहोंकडेस एकदम असलें पाहिजे. समजलीस?

**लक्ष्मी**—जी.

**रामजी**—जी! आतां आठ वाजायाला झाले तरी तुझें कोणतेंच काम आटोपलें नाहीं.

**लक्ष्मी**—भांडीं घांसलीं, सगळें घर झाडलें, पाय धुण्याला पाणी तापवून ठेविलें आहे. हापिसांत बिछायत घातली, घरांतल्या गाद्या गोळा करून ठेविल्या—

**रामजी**—बरें बरें, मोठे कामाचे ढीग पाडले. जा, आतां पोष्टांत जा, आणि माझ्या नांवाचा कागद आला असेल तो घेऊन ये. पोष्टाचा शिपाई ह्या आळींत फार उशिरां येतो, त्याच्या जवळून कागद मागून घे. कशी लवकर येशील, कां कोणी ह्मणेल गेलीच नाहीं.

**लक्ष्मी**—जीं जातें. ( एकीकडेस ) कोणी हें हर-काम्या मोलकरणीचें काम करावें?

**रामजी**—टाकळीच्या सुभेदारानें सोडत निघतांच मला कागद लिहिण्याचें कबूल केलें आहे. वर्तमानपत्रांत नंबर येण्यास अद्यापि बराच उशीर लागेल. तेव्हां ह्या पत्रावरून कोणाला बक्षिस मिळतें त्याची पहिली खबर मला कळेल. माझा नंबर निघाला असला तर—पण जाऊं द्या, ह्या सोडतेवर भरंवसा ठेवून आपल्या कामाकाजांवर दुर्लक्ष करतां उपयोगीं नाहीं. ( हापिसाच्या खोलीच्या दारावर थाप मारून ) **वामन**, अरे **वामन**, काय करितो आहेस!

**वामन**—कांहीं नाहीं, जरा वारा घेत होतों.

**रामजी**—वारा घेत होतों! वारा घेण्यासाठीं मी पगार देतों!

**वामन**—( एकीकडे ) कोणा लेकाला आज दोन वर्षांत पगार मिळाला आहे?

**रामजी**—पहा, तीं कोर्टांतून आजच्या आज समानें जातील अशी तजवीज कर. त्या प्रोसेसीसची आजच्या आज बजावणी झाली पाहिजे. आणि बेलीफाला घेऊन जाऊन प्रतिवादीला आजच्या आज समन्स लागूं कर. त्याला नीट समजून सांग, कीं वादीचे सारे पैसे उगवले तर आपलें साऱ्यांचें कल्याण होणार आहे.

**वामन**—( खोलींतून लिहित असतां ) त्याची काळजी नको. ती मी सारी तजवीज करितों.

**रामजी**—[ ओटीवर पुढें येऊन ] लोकांना पकडून कैद करण्यांत ह्या कुबड्यासारखा दुसऱ्या कोणास आनंद होत नसेल. असा मनुष्य मीं कधीं पाहिला नाहीं. प्रतिवादीला वारंटावर पकडावयाचा असेल तर गुलाम भर उन्हांत पांच कोस बेलिफाबरोबर जाईल, पण त्यास पकडवील. लोकांना दुःख झालें कीं ह्याला मोठा आनंद! गुलामाचें तोंड सुद्धां पाहूं नये असें मनांत येतें. त्याचा तेवढा मागचा चढलेला पगार देऊन टाकण्यास मिळेल तर घटकाभर गुलामाला उभा करूं नये असें वाटतें. पण गुलामाला पक्कें माहीत आहे, कीं चढलेला पगार देऊन टाकण्या पुरा माझ्याजवळ ऐवज नाहीं. ( **पार्वतीबाईच्या** घराकडे पाहून ) हं, आज **पार्वती** गहाणाचे दागिने आणि कपडे

तपासीत बसली आहे. तिचा पाट लावण्याचा खचीत निश्चय आहे. पंचवीस वर्षांची उमर असावी, पण अद्यापि कशी खुटखुटीत दिसते आहे. जवळ चांगली पुंजी करून बसली आहे. पण असो, अद्यापि जास्ती माहिती काढावी.

[ पार्वतीबाई आपल्या ओटीवर येते ]

**पार्वती**—( एकीकडे ) रामजी वकिलाची कीं नाहीं सारावेळ इकडे नजर असते. त्यांची बायको मेली त्याला दोन वर्षे झालीं. तेव्हां ह्मणतात ते अठ्ठाविस वर्षांचे होते. ह्मणजे आतां त्यांची तीस वर्षांची उमर असावी. त्यांच्या तर मनांत खास आहे, रोज लाळ घोटतात. मींच अझून फारसें त्यांच्याकडे लक्ष देत नाहीं. आतां त्यांच्या जवळ जास्ती बोलणें चालणें ठेविलें पाहिजे.

**रामजी**—कायहो पार्वतीबाई, आज सकाळींच काय पसारा काढला आहे?

( **वामन** खिडकींतून डोकें काढून चाललेलें बोलणें ऐकतो ]

**पार्वती**—पसारा कांहीं नाहीं, आतां पाऊस आंगावर येत चालला आहे, ह्मणून ह्मटलें लोकांच्या कपड्यांना एकदां उन्हें देऊन ते बांधून ठेवावेत.

**रामजी**—भारी बुवा तुम्हांला लोकांची काळजी!

**पार्वती**—लोक आपली काळजी करतील तर आपल्याला नको त्यांची करायला?

**रामजी**— बरें, बोलल्याप्रमाणें लक्षांत ठेवा हो.

जे तुमची काळजी करीत असतील त्यांची तुम्हीं केली पाहिजे.

**पार्वती**—[ हांसून आणि मान खालीं घालून ] आह्मांला बायकांना आपल्या वकिलीच्या पगड्यांत धरूं नका हो. बायका आपल्या सहज कमी जास्ती बोलतात.

[ **रामजी** पार्वतीबाईच्या ओटीवर जातो ]

**रामजी**—तुह्मीं कांहीं जास्ती बोललां असें मीं समजतच नाहीं. मीं समजतों कीं तुमच्या मनांत आहे त्या पेक्षां तुह्मीं कमीच बोललां.

**पार्वती**—तुह्मीं वकील काय बोलतां तें मोठमोठ्यांना समजत नाहीं, तें आम्हांला बायकांना कुठून समजेल?

**वामन**—( खिडकींतून ) खरोखरीच रामजी वकील कोडतांत काय बोलतात तें मुन्सफाला सुद्धां समजत नाहीं. हे बोलूं लागले का त्यांना डुलक्या येऊं लागतात.

**पार्वती**—पण तें असूं द्या. मला कीं नाहीं तुमच्या कारकुनाबद्दल तुह्मांला पुष्कळ दिवस सांगायचें होतें. गांवांत ह्मणून तो कोणाला चैन पडूं देत नाहीं. ज्याच्या त्याच्या भोंवतीं हा आहेच. माझ्या येथें कोणी एकसरी गाहाण टाकायला आणली तरी तिचे मणी किती ते ह्याला माहीत; अशी कांहीं त्याला उठाठेव !

**रामजी**—मलाहि त्याच्यापासून असाच त्रास झाला आहे. ( एकीकडे ) पण त्याच्या वांचून माझें चाला-

यचें नाहीं तर. ( उघड ) रात्रीचा माझ्या स्वप्नांत सुद्धां येतो. त्याच्या त्या कुबड्या पाठींत काय काय भरलेलें आहे परमेश्वर जाणे. जेवतांना पुरी फोडली, नाहीं तर वडी मोडली, तर त्यांतून सुद्धां पटकन बाहेर पडेल कीं काय अशी भीति वाटते.

**वामन**—( खिडकींतून हंसत ) हाः हाः हाः, गुलामाला पोटभर भाकरी खायाला मिळत नाहीं, आणि पुरीच्या गप्पा मारतो आहे.

**पार्वती**—मग त्याला काढून कां टाकीत नाहीं?

**रामजी**—व्याजबट्टा करणारणीला जशीं कुळें सुटायचीं नाहींत, किंवा मुद्दलाला जसें व्याज सुटायचें नाहीं, तसा हा मला चिकटलेला आहे.

**पार्वती**—वकिलाला जशीं कुळें सुटायचीं नाहींत, किंवा वकिलातनाम्याला जशी फी सुटायची नाहीं, असें कां म्हणाना?

**रामजी**—वः, ठेवून दिलीत शेवटीं आमच्यावर.

**पार्वती**—पण कीं नाहीं हो, कांहीं म्हणा, पण ह्या वामन्याचा भारीच गांवांत त्रास. कोणाला कोणाला म्हणून चैन पडूं देत नाहीं. ज्याचें त्याचें भांडण लावून देतो.

**रामजी**—दारुबाजाशिवाय जसें कलालाचें चालायचें नाहीं, किंवा उधळ्याशिवाय जसें सावकार-

णीचें चालायचें नाहीं. तसें या विघ्नसंतोषावांचून वकिलाचें चालायचें नाहीं. तंटा उपस्थित होईल तेव्हां वकिलाचें काम. ( एकीकडे ) पण आतां मुद्याची गोष्ट काढली पाहिजे. ( उघड ) जाऊं द्या पार्वतीबाई, मरूं द्या त्या कुबड्याला. कायहो, ती खोलींत भरजरी चोळी पडली आहे, ती गहाणांत आली आहे, का नवी शिवलीत?

**पार्वती**—ती घरीं शिवली. गहाण टाकायला अशीं सनगें गांवांत कोणाजवळ आहेत?

[ चोळी पहाण्यासाठीं **रामजी** खोलींत जातो, **पार्वतीबाई**हि पाठीं जाते. ]

**रामजी**—छेः, ही मुद्दाम शिवलेली चोळी नाहीं, तुह्मी कांहीं ह्मणा.

**पार्वती**—ती कशावरून?

**रामजी**—ही येवढी घट्ट चोळी काय तुमच्या अंगाची? बरें, मुद्दाम येवढी घट्ट केली असलीत ह्मणून काय होतें? शंकर मोठ्या कडीकपाटीं जाऊन बसले ह्मणून काय मदनाचा तेथें प्रवेश झाल्याशिवाय राहिला?

**पार्वती**—हें काय बाई ह्मणतां तें मला नाहीं समजलें! मदन तो कोण? तुमच्या कायद्यांतला, नाहीं तर कोडतांतला कोणी आहे वाटतें!

**रामजी**—होय, आमच्या कोडतांतलाच आहे. त्यानें समन्स काढल्या बरोबर प्रतिवादी हांसत हांसत

कोडतांत हाजर होतो, आणि कबूल जाब देतो, चौकशी लागलीच सुरू होते, ठराव एकदम सांगण्यांत येतो, आणि (तिचा हात धरून) प्रतिवादीस ह्या प्रमाणें बजावणींत एकदम धरून नेतात.

**पार्वती**—हं, हं, हें काय? पाहील कोणी! बरें, मला कांहीं खतेंपत्रें तुम्हांला दाखवायचीं होतीं.

**रामजी**—ठीक आहे. काम आधीं, म्हणजे कामकाज मी म्हणतों हो, नाहीं तर भलतेंच समजाल. संस्कृतांत कामाचा अर्थ निराळाच आहे. चला तर आमचे घरीं. खतेंपत्रें पहाण्यास वकिलाच्या घरासारखें दुसरें ठिकाण नाहीं. (एकीकडे) हिची पुंजी किती आहे ती प्रथम पाहिली पाहिजे. मग आपला शब्द गुंतवावा.

(दोघे **रामजी** वकिलाच्या घरांत जातात. **वामन** दुसऱ्या दारानें लक्षपूर्वक पाहत राहतो)

(**वामन** येतो)

**वामन**—हं, चालले आंत अशुक माशुक. वकील आणि सावकारीण. काम आणि कायदा. कसे एकमत होऊन आंत गेले! पण मला नाहीं हें आवडत. तथापि ह्यांचें लवकरच भांडण होईल, ही एक समाधानाची गोष्ट आहे; पण आतां आपलें आपल्यास काम करूं द्या. (दप्तरांतून कागद काढून वाचतो आणि हांसतो) हाः हाः, हा कागद लहानसा दिसतो आहे, पण एका बड्या कुटुंबाचा ह्यांत घात आहे. हें दुसरें खत, बकऱ्याचें कांतडें

पांचरलेलें हें वाघाचें पिल्लूं आहे. कसे करार दिसण्याला अगदीं शिदे! पण जाणार बापड्याचें वरदार ह्यापासून! हा कर्जरोखा, व्याजाचा दर म्हणाले सारा बारा आणे शेकडा, पण मनोती चक्रवाढी अजून कोठें ठाऊक आहे? नातवाच्या नातवाला सुध्दां ह्याची फेड व्हावयाची नाहीं. ह्या जगांत जितक्या म्हणून लुच्चेगिऱ्या आहेत तितक्या शिकायच्या असल्या तर, वकिलाची कारकुनी करावी. वकिलाचा कारकून कोणी सामान्य मनुष्य समजत असतील, पण हे आमचे लष्करांतले तलवारबाहादर कोंकणे आणि पुरभय्ये मला पाहिल्या बरोबर पळतात. लढाईत तोफेसमोर उभे राहत असतील, किंवा कोणी तलवार म्यानांतून काढली तर ती धरायाला धांवत असतील, पण ह्या पुडक्यांतला एकादा कागद काढून दाखविला तर जीव घेऊन पळतात गुलाम. ( हंसत ) हाः हाः हाः, कोणताही धंदा म्हटला तर त्यांत मजा नाहीं असें नाहीं. पण कारकुनापेक्षां वकिलाची जास्ती मजा. वकील गुलाम लोकांना घरींही घाबरवितात, आणि कोडतांतही घाबरवितात. माझा सोडतींत नंबर निघाला तर, कसेंही करून वकिलीची सनद मिळवून ह्या कारकुनीला रामराम करीन; आणि लोकांची स्वतः खोड तोडीन. ( आंतल्या अंगास गडबड होते ) हं, दोघे येताहेत, ( रागानें पाहून ) कोंबडा कोंबडीसारखे कुरकुरताहेत! चिमणा चिमणी चु चु चु चु करताहेत.

(रामजी आणि पार्वतीबाई येतात.)

**रामजी**—कायहो, हे तुमचे कागदपत्र पाहिले, त्यांवरून तुमची मोठीच पुंजी दिसते. व्याजबीज देखील पुष्कळ येत असेल?

**पार्वती**—गांवांत गहाणाचा धंदा करणारी मीं एकटीच आहें, आणि माझें व्याजही थोडें असतें; त्यामुळें सारे गरजू बहुतकरून माझ्याकडे येतात.

**वामन**—(एकीकडेस) हं हं, सावकारीण वकिलाला भाळली, पण वकिलाचें मन दिसतें सावकारणीवर आणि डोळा दिसतो तिच्या पुंजीवर.

**रामजी**—**पार्वतीबाई**, थोडा पुण्याचा मुरांबा आणवूं का? सकाळीं बरा पित्तशामक.

**वामन**—(एकीकडेस) **भिवानें** केलेल्या गुळांब्याला गुलाम पुण्याचा मुरांबा ह्मणतो.

**पार्वती**—छेः, सकाळींच कशाचा मुरांबा? आंग धुवायाच्या आधीं मीं कांहीं खात नाहीं. पण कायहो, तुमची ही वकिली आमच्या गांवांत आल्यापासून चांगली चालली आहेसें दिसतें; **वामन** साराबेळ लिहीत असतो.

**रामजी**—आतांशा दिवाणीकोर्टाला स्मालकाज कोर्टाचा, आणि फौजदारी कोर्टाला संक्षिप्त चौकशीचा अधिकार मिळाल्यापासून वकिलांचें बरें चाललें आहे. तशांत, सारे खतपत्रें सुद्धां लिहिणारे माझ्याकडे येत

असल्यामुळें दोन पैसे मिळतात. पण असो. पार्वतीबाई, पैशांत खरें ह्मणाल तर मला फारसें सुख वाटत नाहीं, संसारसुख तें निराळेंच आहे. तुह्मांला कसें वाटतें पार्वतीबाई?

**पार्वती**—तुह्मी ह्मणतां तें कांहीं खोटें नाहीं.

**रामजी**—मग पार्वतीबाई विचारूं कां एकदां मीं स्पष्ट? खरेंच तुमच्या मनांत संसारसुखाचा अनुभव घ्यावयाचा आहे कीं नाहीं?

**वामन**—(एकीकडेस) आतां जर आपली आड-काठी ढकलली नाहीं तर दोघांचें नक्की होऊन जाणार; पण हें नाहीं मला आवडणार.

**रामजी**—हें पहा पार्वतीबाई, तुह्मी आह्मी जर एक झालों तर—

**वामन**—[मोठ्यानें] तुह्मांला लवकरच लाहा घ्यावा लागेल.

**रामजी**—माझें ह्मणणें तुमचा आणि आमचा धंदा असा आहे कीं, ते एक झाले असतां आपल्यास लवकरच—

**वामन**—[मोठ्यानें] फौजदारी कोर्टांत जावें लागेल.

**रामजी**—पार्वतीबाई, मीं ह्याप्रमाणें गोष्ट काढ ली म्हणून—

**वामन**—[ मोठ्यानें ] एकदम वारंट काढण्याची जरूर नाहीं.

**रामजी**—अंः, हा **वामन** केवढ्या मोठ्यानें वाचतो!

**वामन**—जी आलों. मला त्या सोडतीसाठीं हाक मारली?

**पार्वती**—( एकीकडे ) आलाच मेला मर्धी शेवटीं.

**रामजी**—( एकीकडे ) काय ह्या गमतीच्या वेळीं गुलाम आला?

**वामन**—त्या सोडतीसाठीं मला हाक मारली!

**रामजी**—( एकीकडे ) सोडत! लग्न किंवा पाट, ही एक प्रकारची सोडतच आहे.

**वामन**—सोडतीचा निकाल चार पांच दिवसांपूर्वींच झाला.

**रामजी**—बरें, आह्मांला माहीत आहे. तूं नकोस सांगायाला?

**वामन**—गांवांत ज्यानें त्यानें टिकिटें घेतलीं आहेत. साऱ्यांच्या तोंडीं सोडत सोडत चालली आहे. कोणी कोणते नंबर घेतले आहेत ते मला माहीत आहेत.

**पार्वती**—माझ्या टिकिटाचा नंबर सांग पाहूं!

**वामन**—तुह्मीं टिकीट घेतलेंच नाहीं, तें मला माहीत आहे.

**पार्वती**—तरी पण माझ्याजवळ एक टिकिट

आहे. मीं विकत घेतलें नसलें तरी कोणाला पाहिजे असल्यास मीं विकत देईन.

( लक्ष्मी येते )

**लक्ष्मी**—टपालाचा शिपाई ह्मणाला कीं मींच कागद घेऊन येतों आतां.

**रामजी**—( एकीकडे ) तर मग कोणाचा नंबर निघाला तें समजेल मला आतां.

**वामन**—लक्ष्मीनेंही एक टिकिट घेतलें आहे.

**रामजी**—काय **लक्ष्मी** ! तूं पण असे पैसे उडवितेस सोडतींत?

**लक्ष्मी**—माझ्या मामेभावानें दिलें मला टिकिट. **वामन**ला तें माहीत आहे.

**वामन**—मला कांहीं माहीत नाहीं. पण—

**लक्ष्मी**—( त्याच्याकडे वळून ) पण काय!

**वामन**—जो दोन पैसे देईल त्याला मामेभाऊ ह्मणण्याला बरें पडतें.

**लक्ष्मी**—( एकीकडे ) काय मेला बोलतो! ( उघड ) मीं खरेंच टिकिट घेतलें नाहीं. माझ्याजवळ रुपाया असता तर मीं तें मेलें टिकिट घेण्यापेक्षां चोळीचे दोन खण घेतले असते, नाहीं तर **पार्वतीबाई**चे उसनवार काढलेले पैसे देऊन टाकले असते.

**रामजी**—**लक्ष्मी**, चोळ्याचे खणना बीण घे-

ण्यापूर्वी **पार्वतीबाई**चे पैसे देऊन टाक आधीं.

लक्ष्मी—पार्वतीबाईनें त्यांच्या पैशांची फेड झाल्याशिवाय कुठें मला चैन पडूं दिलें आहे? विचाराना त्यांना?

**पार्वती—लक्ष्मीनें** केली आपल्या पैशांची तोडजोड.

**लक्ष्मी—पार्वतीबाई,** (एकीकडे) कशी ती त्यांना सांगूं नका. (उघड) मला काय त्या मेल्या टिकिटाचें करायचें? कुठें पडलें आहे-तें मला आठवत सुद्धां नाहीं.

**वामन**—(जवळ जाऊन हंसत) हाः हाः, तुझा नंबर तर निघूं दे, ह्मणजे सांपडतें कीं नाहीं टिकिट तें पहा! बरें, नाहीं सांपडलें तरी माझ्याजवळ साऱ्यांचे नंबर टिपलेले आहेत. (एकीकडे) लवकरच आतां ज्यांचीं त्यांचीं तोंडें उतरून जातील. खुप गम्मत होईल आतां!!

**पार्वती**—जातें मीं आतां.

**रामजी**—बरें, पुन्हा आपण बोलूं ह्या संबंधीं.

(**पार्वतीबाई** जाते)

**रामजी**—(एकीकडे) हिच्या मनांत दिसतें आहे. वय काय हिचें फार नाहीं. पैसाहि हिच्याजवळ पुष्कळ आहे. आज कांहीं ह्मणा, सकाळपासून मुहूर्त चांगला लागला आहे. माझे मनाला आज मोठी हुशारी

वाटते आहे. ह्यावरून माझा नंबरही सोडतींत निघण्याचा संभव दिसतो आहे. (मोठ्यानें) **वामन**, आपलें दप्तर सोड जा. **लक्ष्मी**, आपलें काम कर जा. तुह्मीं सारा वेळ गमतां. येवढे मोठमोठे पगार घेऊन काम न करणें ही मोठ्या शर्मेची गोष्ट आहे.

( **रामजी** जातो )

**लक्ष्मी**—सारा वेळ काम करून सकाळपासून रात्रीपर्यंत सगळ्यांच्या शिव्या खाव्या, आणि महिन्याचा एक रुपाया घ्यावा !

**वामन**—असें नको ह्मणूं लक्ष्मी. मीं तुला कधीं शिव्या देत नाहीं, किंवा तुझ्याशीं वांकडें बोलत नाहीं. तूं जशी हरकामी मोलकरीण आहेस, तसाच मीं हरकाम्या कारकून आहें. आणखी पहा, मोलकरीण आणि कारकून एक झाल्यावर—

( तिचा हात धरितो )

**लक्ष्मी**—( त्याचा हात झिटकारून ) पहा हो **वामन**, दुरून बोलत जा. आणखी माझ्याशीं तूं बोलतच जाऊं नको. त्यांच्या शिव्यांचा आणि तुझ्या गोड शब्दांचा मला सारखाच त्रास येतो.

**वामन**—( हंसत ) हाः हाः, हा डौल कोणाच्या जिवावर तें मला माहित नसेल नाहीं ? मुंबईहून आतां **नारायण** येईल असें तुला वाटतें नाहीं ? वेडी पोर, तो

तुला केंव्हांच विसरला. मुंबईच्या गिरणींत जो काम करतो तो आतां तुझ्यासारखीवर बसला असेल नाहीं! (हंसत) हाः हाः हाः.

( हापिसाच्या खोलींत जाऊन बसतो )

**लक्ष्मी**—काय मेला कुबडा द्वाड आहे? ह्याचा स्वभाव आणि मन ह्याच्या पाठी सारखींच वांकडीं आहेत. पण खरेंच, **नारायण** जर गिरणींत एकादीच्या नादीं लागला असेल तर? ह्या मेल्या कुबड्याला साऱ्या बातम्या.

( **रामजी** आंतून हांक मारितो )

**वामन**—( खोलीच्या आंतून डोकें काढून ) **लक्ष्मी**, तुला आंत हाका मारताहेतना?

**लक्ष्मी**—अरे, मला कान नाहींत वाटतें? ( **नारायण** रस्त्यावर बोलतो ) हा शब्द **नारायणा**चासा वाटतो. केंव्हां आला असेल बरें?

**वामन**—( दारांतून ) होय होय, तुला कान आहेत ते मला दिसताहेत.

( **नारायण** येतो. )

**लक्ष्मी**—हो, हा **नारायण**च आला! कायहो, तुम्ही कधीं आलां?

**नारायण**—हा आतांच आलों.

**लक्ष्मी**—मीं किती दिवस वाट पाहत होतें!

रोज गाडीची वेळ झाली ह्मणजे तुमच्या घरीं एकदां जाऊन येत असें.

वामन—(दारांतून) लक्ष्मी, तुला हांका मारिताहेत, तें विसरलीस काय?

लक्ष्मी—काय मेला द्वाड आहे? मीं येतें हो जाऊन परत आतां. (एकीकडेस) नारायण आतां पहिल्यापेक्षां बरा दिसतो आहे!

(आंत जाते)

नारायण—काय करावें? ही लक्ष्मी तर इतक्या गरीबींत आहे, आणि माझ्याजवळ तर फारसे पैसे नाहींत. हिच्याशीं लग्न केल्यावर संसार कसा चालावा? ह्या लक्ष्मीला उगीच गोत्यांत घालून उपयोग नाहीं. हं, ती लक्ष्मी परत येते आहे.

(लक्ष्मी येते)

लक्ष्मी—आतां मला जरा फुरसद आहे, दोन घटका आपण बोलत बसूं. मीं आज किती दिवस झाले तुमची दोन दोन डोळ्यांनीं वाट पाहत होतें.

नारायण—मींहि मुंबई सोडायला किती दिवस पाहत होतों.

लक्ष्मी—माझ्या मनांत आलें होतें कां मुंबईस जाऊनच तुह्मांला भेटावें, आणखी मुंबईसच रहावें.

नारायण—मुंबईस रहावें असें मनांत आलें

तुला केव्हांच विसरला. मुंबईच्या गिरणींत जो काम करतो तो आतां तुझ्यासारखीवर बसला असेल नाहीं! (हंसत) हाः हाः हाः.

(हापिसाच्या खोलींत जाऊन बसतो)

**लक्ष्मी**—काय मेला कुबडा द्वाड आहे? ह्याचा स्वभाव आणि मन ह्याच्या पाठी सारखींच वांकडीं आहेत. पण खरेंच, **नारायण** जर गिरणींत एकादीच्या नादीं लागला असेल तर? ह्या मेल्या कुबड्याला साऱ्या बातम्या.

(**रामजी** आंतून हांक मारितो)

**वामन**—(खोलीच्या आंतून डोकें काढून) **लक्ष्मी**, तुला आंत हाका मारताहेतना?

**लक्ष्मी**—बरें, मला कान नाहींत वाटतें? (**नारायण** रस्त्यावर बोलतो) हा शब्द **नारायणा**चासा वाटतो. केव्हां आला असेल बरें?

**वामन**—(दारांतून) होय होय, तुला कान आहेत ते मला दिसताहेत.

(**नारायण** येतो.)

**लक्ष्मी**—हो, हा **नारायण**च आला! कायहो, तुम्ही कधीं आलां?

**नारायण**—हा आतांच आलों.

**लक्ष्मी**—मीं किती दिवस वाट पाहत होतें!

रोज गाडीची वेळ झाली ह्मणजे तुमच्या घरीं एकदां जाऊन येत असें.

**वामन**—( दारांतून ) लक्ष्मी, तुला हांका मारिताहेत, तें विसरलीस काय?

**लक्ष्मी**—काय मेला द्वाड आहे? मीं येतें हो जाऊन परत आतां. ( एकीकडेस ) नारायण आतां पहिल्यापेक्षां बरा दिसतो आहे!

( आंत जाते )

**नारायण**—काय करावें? ही लक्ष्मी तर इतक्या गरीबींत आहे, आणि माझ्याजवळ तर फारसे पैसे नाहींत. हिच्याशीं लग्न केल्यावर संसार कसा चालावा? ह्या लक्ष्मीला उगीच गोत्यांत घालून उपयोग नाहीं. हं, ती लक्ष्मी परत येते आहे.

( लक्ष्मी येते )

**लक्ष्मी**—आतां मला जरा फुरसद आहे, दोन घटका आपण बोलत बसूं. मीं आज किती दिवस झाले तुमची दोन दोन डोळ्यांनीं वाट पाहत होतें.

**नारायण**—मींहि मुंबई सोडायला किती दिवस पाहत होतों.

**लक्ष्मी**—माझ्या मनांत आलें होतें कां मुंबईस जाऊनच तुह्मांला भेटावें, आणि मुंबईसच रहावें.

**नारायण**—मुंबईस रहावें असें मनांत आलें

होतें ! वेडी आहेस तूं; मुंबईस कशाला रहाणार ?

लक्ष्मी—मुंबईस गिरणींत दोन पैसे मिळतील, आणि इथला मेला त्रास चुकेल.

**नारायण**—गिरणींत राहणार ! वेडी आहेस तूं; माहिती नाहीं तुला गिरणीची ! गिरणींत माणसें तेव्हांच बिघडतात.

लक्ष्मी—मग तुम्ही नाहींना बिघडला ?

**नारायण**—मीं ! माझी निराळी गोष्ट आहे.

लक्ष्मी—हं, मीं समजलें, तेथें तुमचें काय चाललें तें मला समजेल ह्मणून मीं नको मुंबईस यायला, आणखी काय ?

**वामन**—( खिडकींतून हंसत ) हाः हाः हाः, लागलें दोघांचें भांडण. हें ठीक, हें ठीक झालें. आतां जरा बरें वाटतें.

**नारायण**—वेडी आहेस तूं, मींच आतां मुंबईस जायचा नाहीं. आतां येथेंच घरच्याघरीं राहण्याचा मीं बेत केला आहे.

लक्ष्मी—मुंबईस जायचेंच नाहीं ? तर मग बरें झालें.

**वामन**—( खिडकींतून ) हं हं, पुन्हा चालले दोघांचे जुळत ! प्रिय आणि प्रिया होणार आतां ! प्रेम पाळतो आहे प्रेम !! हें ठीक नाहीं, आतां मध्यें पडलेंच पाहिजे मला.

( **वामन** येतो )

**वामन**—लक्ष्मी, अग लक्ष्मी, तूं उगाच येथें गोष्टी सांगत वेळ घालवितेसना? मी सांगेन दादाना हो!

**लक्ष्मी**—**वामन** तूं आपलें काम करिनास? लोकांच्या पंचायती करायची कांहीं जरूर आहे तुला! कोणी कांहीं बोलत असलें कां लावलेच तेथें कान.

**नारायण**—जेथें ते कान उपटले जातील तेथें नाहीं लावले तर बरें.

**वामन**—उपटतोस कां माझे कान? उपट पाहूं! अन्यायाची बळजोरी केल्याबद्दल शिक्षा नाहीं देववीन तर माझें नांव वामन नाहीं.

**लक्ष्मी**—( **नारायणास** ) जातें मी आतां, पण पहा हो काय बोललांत तें. मुंबईस आतां जायचें नाहीं.

**नारायण**—नाहीं.

( **लक्ष्मी** जाते )

**वामन**—तर मग **नारायण**, तूं आतां येथेंच राहणार कायरे? तुला गिरणींतून काढून टाकला असेल नाहीं!

**नारायण**—तें कां? मला कां काढून टाकतील!

**वामन**—तर मग तुलाच निघावें लागलें असेल!

**नारायण**—नाहीं. मला निघावेंहि लागलें नाहीं.

**वामन**—तर मग तुझी गिरणी बुडाली असेल, नाहीं तर जळाली असेल?

**नारायण**—ह्मणजे मोठा तुला आनंद ना ? लोकांचें वाईट झालें कां तूं लागलासच टिरी कुटायला ! (स्वतःशीं ) बरें दोन पैसे जवळ राहिले आहेत, त्यांचें काय करावें ? कांहीं तरी व्यापार धंद्यांत घालून उलेंढालें करावयास सांपडतें तर बरें.

**वामन**—उलेंढालें ? मग सोडतीचें टिकीट कां नाहीं घेतलेंस ?

**नारायण**—सोडतीचें टिकीट ? मिळतें एक तर बरें होतें. माझी सद्दी सध्यां चांगली आहे. सोडतींत सुद्धां दोन पैसे मिळतील. मिळेल तर मिळेल अजून एकादें टिकीट.

**वामन**—आतां नाहीं मिळावयाचें. **रामजीदादा**कडेस थोडेसे नंबर आले होते. मागल्या खेपेच्या सोडतींत **सदाशिवराव गुल्ल्यांना** दहा हजार रुपये मिळाल्यामुळें ह्या खेपेचे नंबर एक कां दोन दिवसांत उडाले. साऱ्या बायकापोरांनीं सुद्धां टिकिटें घेतलीं आहेत. गांवांत आतां व्यापार सुरू झाला आहे. रुपायाच्या टिकिटाला दोन रुपये येतात.

**नारायण**—मला कोणी आपलें विकील तर मीं दोन रुपये सुद्धां देईन.

**वामन**—पण विकतो आहे कोण आतां ? पहा पण, **पार्वतीबाई** जवळ एक विकायाचें टिकीट आहे.

**नारायण**—हो, बरें स्मरण झालें. मला पार्वती-बाईजवळ काम आहे. इकडे आलों मुळीं तेवढ्यासाठीं, आणि तेंच विसरून जात होतों. बरें मीं जातों तर.

( पार्वतीबाईच्या घरांत जातो. )

**वामन**—पार्वतीबाईजवळ काम? म्हणजे कामच तें. कांहीं तरी गडबड आहे. बरें झालें, लक्ष्मीला हें समजलें पाहिजे. ( हाका मारितो. ) लक्ष्मी, अग लक्ष्मी.

( लक्ष्मी येते )

**लक्ष्मी**—काय बाबा आतां तुझें राहिलें? सारावेळ तूं माझा पिच्छा-सोडूं नकोस.

**वामन**—तुझा पिच्छा? माझें काय आडलें आहे? तो नारायण पार्वतीबाईच्या घरांत शिरला तें पाहवयाला तुला बोलाविलें.

**लक्ष्मी**—( पार्वतीबाईच्या घराकडे पाहून स्वतःशीं ) गेला आहे खरा त्यांच्या घरांत. ( उघड ) ह्याला पार्वती बाईच्या घरीं काय काम?

**वामन**—काम! कोणीही तरणाताठा आला असतां त्याच्याजवळ पार्वतीबाईला काम असतें, तें नाहीं कां तुला ठाऊक? तो त्यांच्या मागल्या खोलींत जातो आहे पहा!

**लक्ष्मी**—( रडकुंडी होऊन ) नारायणा, काय आतां तुला ह्मणूं? माझ्या डोळ्यासमोर असें?

**वामन**—म्हणून ह्मणत होतों ना कां ऐक माझें.

**लक्ष्मी**—तुझें ऐक?

**वामन**—हो माझेंच ऐक. मीं नाहीं **नारायणा** सारखा पार्वतीबाईच्या घरांत जाणार.

( **रामजी** येतो )

**रामजी**—आला का पोष्टाचा शिपाई? लक्ष्मी, हो पुढें पाहूं. तो पुढच्या आळींत आला असेल. त्याच्या जवळून कागद घेऊन ये.

**लक्ष्मी**—( ओटीवरून **पार्वतीबाईच्या** घराकडे पाहत उभी राहते ) जी जातें.

**रामजी**—जात कां नाहींस तर? काय पाहत उभी राहिली आहेस?

**लक्ष्मी**—कांहीं नाहीं. तो **नारायण**, मुंबईहून आलेला **नारायण**—

**रामजी**—**नारायण! नारायणाचें** काय?

**लक्ष्मी**—तो **पार्वतीबाईच्या** मागल्या खोलींत गेला आहे.

**रामजी**—काय? **नारायण पार्वतीबाईच्या** मागल्या खोलींत गेला आहे? तरणाताठा परका पुरुष **पार्वतीबाईच्या** खोलींत कां?

**वामन**—( एकीकडे हंसत ) हाः हाः, दोघांच्याही मनांत मत्सर उत्पन्न झाला. खूप गम्मत उडाली आतां.

**लक्ष्मी**—तो बाहेर येत आहे **नारायण**. हो, मी विसरलें, तो माझ्यासाठीं आडगिन्हाइकी नथ **पार्वतीबाई** जवळून घेणार होता. ती त्याच्या हातांत नथच दिसते आहे. मीं आतां जाऊन पाहतें नथ.

( **लक्ष्मी** जाते )

**रामजी**—आमच्या कोडतांत हा कोण वकिली करणार ? ह्या कोडतांतून ह्याचें नांव काढवून टाकिलें पाहिजे. पण तें असो, सोडतींत माझा नंबर निघाला असेल तर—

( **वामन** एकदम पुढें येऊन )

**वामन**—आणि माझा निघाला असला तर ?

**रामजी**—( एकीकडे ) ऐकलेंच गुलामानें शेवटीं मीं काय ह्मणालों तें. ( उघड ) बरें, तुझा निघूं दे, कांहीं हरकत नाहीं.

**वामन**—( खोलींत जाऊन ) माझा निघाला नाहीं तरी हरकत नाहीं. पण जितक्यांचे निघणार नाहींत, तितक्यांकडे पाहून आज पोट भरून हांसेन. साऱ्यांचीं तोंडें उतरून जातील तीं पाहण्यांत खूप गम्मत उडेल. यादी हातीं आली ह्मणजे जो विचारण्याला येईल त्याला सांगेन, फसलें! फसलें! फसलें! ( हांसत ) हाः हाः, काय गम्मत होईल !

( **लक्ष्मी** कागद घेऊन येते )

**लक्ष्मी**—हा शिपायानें कागद दिला आहे.

**रामजी**—दे, तो इकडे दे, आणि तूं जा बाहेर.

**लक्ष्मी**—जी.

( **लक्ष्मी** जाते. )

**रामजी**—( पत्र खालीं वर पाहून ) हो, हेंच पत्र तें. टाकळीचाच छाप हा. ह्यांत कोणकोणत्या नंबराला बक्षीस मिळालें तें लिहिलें असेल.

( **वामन** पटकन् येतो )

**वामन**—कोणकोणत्या नंबराला बक्षीस मिळालें तें पहा लवकर. फोडा, फोडा पत्र.

**रामजी**—( एकीकडे ) आलाच शेवटीं हा. ( पत्र फोडण्याचा प्रयत्न करितांना उघड ) टाकळीच्या सुभेदारानें अगत्यपूर्वक लागलेंच पत्र लिहिलें. त्याची मोठी मेहरबानी समजली पाहिजे.

**वामन**—कायहो! असें काय हें? हात कां इतका कांपतो आहे?

**रामजी**—हात कांपतो! छेः बिलकुल नाहीं. मीं तत्त्ववेत्ता आहें. या जगतांत येणाऱ्या कोणत्याही संकटास मीं भिणार नाहीं. पण काय होतें आहे कोण जाणे? तूं ह्मणतोस तें खरें, कांहीं चमत्कारिक होतें आहे. पत्र फोडतां येत नाहीं.

**वामन**—मजजवळ द्या तर, मी फोडतों. ( पत्र घेतो आणि फोडण्याचा प्रयत्न करितो ) कोणत्याही संकटास न

भिणारे तत्त्ववेत्त्यांचे नशिबाची परिक्षा होण्याची वेळ आली असतां हात कांपू लागावेत ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे!

**रामजी**—कां, तुझेहि हात कां कांपतात?

**वामन**—छे:; माझे हात कशाचे कांपतात? पत्राला शील मोठा मजबूद केला आहे, कां आंतलें बक्षीस कोणी घेऊंनच जाईल. घ्या, हें घ्या, फोडलें.

**रामजी**—(पत्र घेऊन वाचण्याचा प्रयत्न करितो) पाहूं काय आहे तें. हें फार चमत्कारिक आहे! फारच चमत्कारिक आहे!! पत्रांतील अक्षरें खालीं वर नाचल्यासारखीं दिसतात. मला चष्म्याशिवाय नाहीं वाचतां येत.

**वामन**—द्या तर मग इकडे. मला चष्म्याशिवाय वाचतां येईल. (पत्र घेतो)

**रामजी**—वाच तर वाच.

**वामन**—नंबर चार हजार पांचशें सहासष्ट.

**रामजी**—हो, हो, चार हजार पांचशें सहासष्टच माझा नंबर आहे, मग?

**वामन**—फसलें.

**रामजी**—फसलें! माझा नंबर नाहीं निघाला!

**वामन**—(कान खाजवीत) होय, नाहीं निघाला. आणि माझा पण नाहीं निघाला.

**रामजी**—किती दुर्दैवी प्राणी मीं आहें!

**वामन**—नाहीं नाहीं, इतके दुर्दैवी नाहीं तुह्मी. तुमच्या नंबरापुढचाच नंबर, चार हजार पांचशें सदुसष्ट, ह्या नंबराला दहा हजार रुपयांचें बक्षीस आलें आहे.

**रामजी**—अरे! अरे! मग एक नंबरानें सारें चुकलें! पण कानाजवळून गेली काय आणि हातावरून गेली काय, फळ एकच.

**वामन**—चार हजार पांचशें सदुसष्ट हें टिकिट घेतलें आहे कोणी तें पाहूं बरें. मी साऱ्यांचे नंबर टिपून ठेविले आहेत. कोठें गेली माझी यादी?

• **रामजी**—तो माझा नाहीं मग मला काय त्या नंबराशीं करायचें आहे?

**वामन**—(खिसा चाचपून पाहतो) कोठें गेली ती यादी? हं, हं, सांपडली. (वाचून पाहतो) हं, बरोबर आहे. माझी चूक आहे कीं काय ह्मणून वाटत होतें, पण चूक नाहीं.

**रामजी**—मग कोणाला मिळालें बक्षीस?

**वामन**—लक्ष्मीला.

**रामजी**—आमच्या मोलकरणीला?

**वामन**—हो तिलाच.

**रामजी**—आमच्या मोलकरणीला दहा हजार रुपये मिळाले. आतां कशाला भांडीं घांशील आणि घर झाडील? पण एक विचार माझ्या मनांत आला आहे. पसंत तर फार चांगली आहे.

**वामन**—ती काय ?

**रामजी**—आपल्याला नंबर समजले आहेत ते कोणाला सांगूं नकोस.

**वामन**—तें कां ?

**रामजी**—वर्तमानपत्रांत नंबर उद्यां येतील.

**वामन**—मग तुह्मीं आपलें टिकिट विकून टाकणार होय ?

**रामजी**—छे:, अशी दगाबाजी कधीं करूं नये. जनाची नाहीं पण मनाची लज्जा आहे कीं नाहीं ?

**वामन**—वकिलाच्या घरीं मनाचा कांहीं संबंध नसतो, जनाचाच असतो. आणि लाज आणि लज्जा तर आपण गुंडाळूनच ठेवितों.

**रामजी**—आपल्याला बक्षीस मिळणार आहे ह्मणून लक्ष्मीला अद्यापि माहीत नाहीं.

**वामन**—बरें मग !

**रामजी**—वामन, कमेंही करून तिला सांगूं नकोस इतक्यांत.

**वामन**—तें कां ?

**रामजी**—तें लवकरच समजेल तुला. (भांडें पडल्याचा आवाज होतो) हं, हें काय ! हें काय पडलें ?

**वामन**—लक्ष्मीनें फुलपात्र पाडून फोडलें. तें घेऊन येत आहे ती.

(**लक्ष्मी** फुलपात्राचे तुकडे घेऊन येते)

**लक्ष्मी**—( डोळे पुशीत ) फुलपात्र फुटलें खरें माझ्या हातून, पण माझी चूक नाहीं. हातांतून खालीं पडलें तों फुटून दोन तुकडे झाले.

**रामजी**—काय मौजेचें नाशिकचें भांडें होतें!

**वामन**— ( एकीकडे ) दीड दमडीचें गांवठी फुलपात्र त्याला नाशिकचें भांडें ह्मणतो!

**रामजी**—अडाणी पोर! (राग दाबून) हरकत नाहीं लक्ष्मी, तूं रडकुंडी नको होऊं, चाललेंच आहे. पडतें भांडें माणसाच्या हातून एकादे वेळीं.

**लक्ष्मी**—( एकीकडे ) आज मोठें नवल झालें! त्यांना राग आला नाहीं.

**रामजी**—वामन, तूं जा आतां घरीं. उशीर होतो तुला.

**वामन**—बरें आहे जातों. लक्ष्मी, जा तें भांडें दादांच्या हातांत दे. पाहूं दे त्यांना कसें फुटलें तें. ( एकीकडे ) बरें, तुमचा सुरू होऊं द्या प्रेम कां आलोंच मध्यें मीं.

**रामजी**—लक्ष्मी, इकडे आण पाहूं तें फुलपात्र.

**लक्ष्मी**—जी आणतें. ( त्याच्या हातांत देते )

**रामजी**—हें फुलपात्र फोडलेंसना लक्ष्मी!

**लक्ष्मी**—जी.

**रामजी**—बरें कांहीं हरकत नाहीं. तुझ्यापेक्षां कांहीं फुलपात्र जास्ती नाहीं.

**लक्ष्मी**—( एकीकडे ) आज काय बरें ह्यांच्या मनांत आहे?

**रामजी**—मीं तुला फार रागें भरतों नाहीं!

**लक्ष्मी**—जी.

**रामजी**—पण माझ्या मनांतला खरा भाव कळून येऊं नये ह्मणून मीं रागावतों.

**लक्ष्मी**—( एकीकडे ) मला वाटलें कां तो समजावा ह्मणून रागावतात.

**रामजी**—तें तुला माहीत नाहीं **लक्ष्मी.** मीं तुजवर न रागावतों तर माझ्या मनांत खरें काय आहे तें लोक तेव्हांच ताडते. ( एकीकडे ) आतां एकदां गोष्ट तर काढून पहावी.

**लक्ष्मी**—( एकीकडे ) आज ह्यांच्या मनांत काय आलें आहे बरें? माझी मस्करी तर करीत नाहींत!

( **वामन** घरांत डोकावून पाहतो, मान डुलवितो आणि **पार्वतीबाईच्या** घराकडे जातो )

**रामजी**—( एकीकडे )**लक्ष्मीला** आपल्या नशीबानें उपट घेतलेली अद्यापि माहीत नाहीं. ह्यासाठीं आमचा अर्ज तावडतोब दाखल करून कबूल जाब घेतला पाहिजे. ( उघड ) **लक्ष्मी.** तुला भांडीं घांसावीं लागतात आणि घर झाडावें लागतें, त्याचें तुला वाईट वाटत असेल नाहीं!

**लक्ष्मी**--पोटासाठीं केलं पाहिजे तें पण. मुंबईस गिरणींत जाईन ह्मणून म्हणत होतें, पण **नारायण** नाहीं ह्मणतो. तो ह्मणतो तेथें माणसें बिघडतात.

**रामजी**—**नारायणा**चें असूं दे. पण कायगे, हें काम तुझें सुटेल अशी कांहीं तुला तोड सांगितली तर?

**लक्ष्मी**—ती काय?

**रामजी**—तुझ्या आईला जा बोलावून आण आतांच.

**लक्ष्मी**--पगाराला आतां येणार आहे ती. ती आलीच वाटतें.

( **सगुणा** येते )

**रामजी**—बऱ्या आलांत **सगुणाबाई**, आज तुह्माला बोलावयाला पाठवीत होतों आतां.

**सगुणा**—बोलावयाला कशाला पाहिजे? महिना भरल्या बरोबर पगाराचे पैसे हातीं येवो येवोतसे होतात. एक महिन्याची गांठ दुसऱ्या महिन्याला पडत नाहीं.

**रामजी**—त्याचीच कांहीं तोड सांगणार होतों.

**सगुणा**—असें कांहीं सांगाल तर मग काय पाहिजे आह्माला? दोन महिने झाले, **लक्ष्मीचें** लुगडें फाटलें आहे, तें नाहीं मिळत नवें घ्यायला.

**रामजी**—एकादा वकील **लक्ष्मीबरोबर** लग्न लावण्यास कबूल असला तर द्याल का तिला? मग हवीं तिवढीं लुगडीं मिळतील.

**लक्ष्मी**—वकील! अगबाई!

**रामजी**—हो वकील.

**सगुणा**—मराठ्यांत वकील आहेत कोण? एक **रामजीदादा** साऱ्यांच्या नशिबानें वकील झालेले काय ते मीं पाहतें, आणि माझ्या सारख्या भिकारडीच्या पोरी-बरोबर कोणता वकील लग्न लावणार?

**रामजी**—( एकीकडे ) तुह्मीं आतां भिकारडी! ( उघड ) येथेंच आहे तो, **सगुणाबाई**.

**सगुणा**—माझ्या गरीबाची थट्टा करितां आहां आपण.

**रामजी**—थट्टा! मीं कधीं कोणाची थट्टा करीत नाहीं. थट्टा करील त्याच्यावर अब्रूची फिर्याद होऊं शकते.

**लक्ष्मी**—( एकीकडे ) **रामजीदादा** माझ्याशीं लग्न लावतील? मग मला काय हवें दुसरें? पण **नारायण** काय ह्मणेल?

( **वामन पार्वतीबाईस** खूण करून ओटीवर बोलावितो आणि तिच्या कानांत कांहीं सांगतो. )

( **पार्वतीबाई** येते. )

**पार्वतीबाई**—छे: तूं भलतेंच सांगतोस. मला कधीं खरें वाटायाचें नाहीं.

**वामन**—बरें तर स्वतः पहा, ऐका, आणि मग आपला आपणच निकाल करा.

( **पार्वतीबाई रामजी**वकिलाच्या ओटीवर जाऊन दाराच्या फटींतून आंत पाहते. )

**सगुणा**—( हंसत हंसत ) पण **पार्वतीबाई**ना विचारलेंत कां?

**रामजी**—**पार्वती**! छेः वेडी आहां तुह्मीं. ती आमची शेजारीण ह्मणून आली गेली ह्मणजे आपलें बोलावें चालावें लागतें तिच्याशीं. ती कधींमधीं जास्ती बोलूं चालूं लागते, आणि तिला दोन गप्पा सांगून फसवावी पण लागते; पण त्यांत कांहीं अर्थ कां आहे? शिवाय, ती फार दिवस नवऱ्याबरोबर एकटीच पुणें मुंबईस राहिलेली आहे, तेथें काय चाललें होतें आणि काय नाहीं. मीं असल्या भानगडीच्या खटल्यांत पडेन?

**सगुणा**—**पार्वतीबाई** अशा नाहींत, राग येईल त्यांना असें कांहीं त्यांनीं ऐकलें तर. त्याच येत आहेत आंत.

**रामजी**—काय त्रास हा!

**पार्वती**—**रामजीदादा**—

**रामजी**—**पार्वतीबाई**, तुमच्याकडे कोणी अधिकदोरा, कां पुतळ्यांची माळ गहाण ठेवण्यास गेला आहे. त्याला भेटून या आधीं. नाहीं तर एक कूळ हातांतील जाईल.

**पार्वती**—बरें आहे वकीलसाहेब, जातें हो. बरी

आहे आपल्याला आमची आणि आमच्या कुळांची काळजी. लक्ष्मीची पण अशीच काळजी ठेवा. नाहीं तर तिला पण फसवाल. नाहीं पण, तिला कशी फसवाल तुमच्या लायक फटाकडी मिळाल्यावर? त्रीं तिच्या कपाळाचीं भांडीं आणि केरसुणी जातील. मोलकरणीची वकिलीण झाली मग तिला तरी काय पाहिजे? काय ते मेले लोक हांसतील तुह्माला तर हांसतील. त्यांचे दांत दिसतील.

**रामजी**—पार्वतीबाई, लोक कां हांसतील? ईश्वरानें तिला गरीब स्थितींत ठेविली आहे ह्मणून? पण गांवांतल्या दहाजणींपेक्षां ती रुपानें चांगली आहे. आणि रुपाला काय करता? तिच्या गुणाकडे पहाल कीं नाहीं? गरिबीवर काय आहे?

**पार्वती**—व:, काय मोलकरणीचें रुप आणि गुण! पण तिलाहि नाहींना फसवायची? का तिशीं पण हरामखोरी करायची?

**वामन**—( दारांतून एकीकडे ) शाबास पार्वतीबाई, चालूं दे असेंच. खोड तोड गुलामाची.

**रामजी**—लक्ष्मीला कोण फसवील? तिच्या गुणाची ज्याला परीक्षा नसेल तो तिला फसवील.

**पार्वती**—काय मेलें रांडरूं? आणि काय तिची प्रतिष्ठा वाढविली आहे?

**लक्ष्मी**—पार्वतीबाई, मी गरीब झालें म्हणून आपल्या नवऱ्यांना निर्दाळून बसल्या आहेत, त्यांच्या-सारखी रांडरूं नाहीं झालें.

**वामन**—( एकीकडे हंसत ) हाः हाः हाः, आतां मात्र हवें तसें जमलें! काय गम्मत उडाली आहे! सग-ळींच लागलीं भांडायला. चालूं द्या, चालूं द्या असेंच.

**पार्वती**—बरें, आतां थेरड्याबरोबर लग्न लावून तुम्ही अखंड सौभाग्यवती व्हा म्हणजे झालें.

( **पार्वतीबाई** रागानें जाते )

**रामजी**—पिडा गेली एकदाची. हेडली आहे, शुद्ध हेडली. पण जाऊं द्या आतां, पिडा गेली. **सगुणाबाई**, तुम्हांला कबूल असेल तर मीं लक्ष्मीबरोबर खचीत लग्न लावणार आहें.

**लक्ष्मी**—( एकीकडे पण **वामन** ऐकतो ) तर मग आतां खरोखरीच मोलकरणीची वाकिलीण होणार मीं.

**वामन**—हो हो, आमची यजमानीन होणार तूं.

**लक्ष्मी**—( एकीकडे ) ऐकलेंच शेवटीं मेल्यानें.

**सगुणा**—माझ्या मुलीला असें ठिकाण मिळा-ल्यावर दुसरें काय हवें मला? पण तिचें आणि **नारा-यणाचें** आज बरेंच दिवस जमल्यासारखें आहे. त्यानें तिला चार पैसे दिलेले आहेत. त्याची तेवढी हरकत नसली पाहिजे.

**रामजी**—त्याला बोलवून आणून दोन पैसे द्या, आणि त्याची फारगती घ्या म्हणजे झालें. मी **वामनला** लिहिण्याला मांगतों ती.

( **वामन** येतो )

**वामन**—जी आलों.

**रामजी**—जी आलों? कोणा लेकानें तुला बोलाविलें होतें?

**वामन**—फारगती लिहावयाची आहेना? तेवद्यासाठीं तर कागद आणि दौत लेखणी घेऊन आलों. **नारायणाला** काय? दोन पैसे दिले तर तो आतां फारगती लिहून देईल. त्याला लक्ष्मीसारख्या आणखी दहा बायका मिळतील!

**रामजी**—( एकीकडेस ) रांडलेकानें सर्व ऐकलेंसें दिसतें. काय विघ्न आणील तें आणो.

**सगुणा**—त्यानें लक्ष्मीला आजपर्यंत पुष्कळ पैसे दिले आहेत, आणि आमच्यावर भारी उपकार केले आहेत.

**वामन**—ते आतां सहज फेडून टाकतां येतील, लक्ष्मीच्या पैशांतले हजार पांचशें त्याला दिले म्हणजे तो खुष होऊन जाईल.

**सगुणा**—येवढे पैसे कसे मागावे आम्हीं वकिलांच्याजवळ?

**वामन**—वकिलांच्याजवळ कशाला मागायला

पाहिजेत? लक्ष्मीच्याच पैशांतले द्या ह्मणजे झालें.

**रामजी**—( एकीकडेस ) रांडलेक सांगणार आतां सर्व.

**सगुणा**—लक्ष्मीजवळ येवढे पैसे असते मग कशालारे बाबा आमची अशी दशा असती?

**वामन**—कां, त्या दहा हजारांतले हजार पांचशें दिले तर काय झालें?

**सगुणा**—दहा हजार रुपये? दहा रुपये आह्मीं एकाजागीं पाहिले नाहींत, तों दहा हजार रुपये ह्मणजे काय तें आह्मांला कशाला समजणार?

**वामन**—पण आतां दहा हजार मोजून द्यायचे आहेत.

**सगुणा**—कां बाबा आमची गरिबाची अशी थट्टा करितास?

**वामन**—थट्टा! तुमच्या लक्ष्मीजवळच्या टिकिटाचा नंबर दाखवा वकिलांना, म्हणजे तिला दहा हजार रुपये मिळणार आहेत कीं नाहींत तें सांगतील ते. लक्ष्मीला मी सांगितला होता कीं नाहीं नंबर चार, पांच, सहा, सात, विचारा तिला?

**लक्ष्मी**—हो, चार, पांच, सहा, सात, असेंच **वामन** बोलला होता.

**वामन**—तर मग त्याच नंबराला दहा हजार

रुपयांचें बक्षीस मिळालें आहे. आतां वकिलाबरोबर लक्ष्मीला लग्न लावण्याला हरकत नाहीं.

**लक्ष्मी**—असें बक्षीस मिळेलसें कोणाला माहीत होतें? ( **सगुणेच्या** कानांत कांहीं सांगते )

**सगुणा**—नशीब बाई, तुझें तर.

**रामजी**—**सगुणाबाई**, तुमच्या मुलीला बक्षीस मिळो नाहीं तर न मिळो, मला तिच्या रुपायांशीं काय करायचें आहे? तिचे गुण मला तिच्या रुपयांच्या ठिकाणीं आहेत. तिच्याजवळ एक छत्रपतीहि नसला तरी मीं तिच्या गुणासाठीं तिच्याशीं लग्न लावणार.

**सगुणा**—तिच्या गुणासाठींच लग्न लावाल तर!

**रामजी**—कां बरें, असें कां ह्मणतां?

**सगुणा**—तें टिकिट आमच्याजवळ नाहीं.

**रामजी**—काय हरकत नाहीं, हरवलें असलें तर. पैसे दुसरे कोणाला मिळूं नयेत अशी आपण तजवीज करूं.

**लक्ष्मी**—हरवलें नाहीं तें टिकिट आई.

**रामजी**—मग काय केलेंस तर त्याचें?

**लक्ष्मी**—**पार्वतीबाईचे** दोन पैसे देणें होते, त्यांचा त्यानीं तगादा लावला होता, आणि सारे मला रागें भरूं लागले ह्मणून तें मीं त्यांना विकत दिलें.

**वामन**—( मोठ्यानें हंसत ) हाः हाः हाः, खूप गमत झाली.

**रामजी**—काय बेशरम्यासारखा हांसतोस ?

**वामन**—काय करूं ? हंसू आल्याशिवाय राहत नाहीं.

**सगुणा**—अरे बाबा, गरीबाचें गेलें त्यांत तुला काय येवढी मजा वाटली ?

**वामन**—तुम्हांला नको वाईट वाटायला **सगुणा-बाई** ! **रामजीदादा** तुमच्या मुलीशीं तिच्या गुणासाठीं लग्न लावणार. पैशाशीं त्यांना काय करायचें आहे ! तुमची मुलगी कोठून तरी वकिलीण होणार.

**रामजी**—जिनें दहा हजार रुपये घालविले अशा बेवकुप पोरीशीं मी लग्न लावणार ? जा सारी आपआप-ल्या कामाला.

**सगुणा**—नाहीं माझ्या **लक्ष्मी**ला असा नवरा मिळाला तेंच बरें झालें बाबा.

**लक्ष्मी**—( एकीकडेस ) **नारायणा**ला टाकून वकि-लीण होण्यासाठीं मीं हुलारले होतें ह्मणून बरी पडली माझ्या तोंडांत माती.

( **लक्ष्मी** आणि **सगुणा** जातात )

**वामन**—आतां दादा, **पार्वतीबाईशीं** पाट लाव-ण्याचा पुन्हां विचार करा. त्या आतां पाहिल्यापेक्षां दाहा हजार पट सुंदर दिसूं लागतील.

**रामजी**—तें खरें, पण तिच्याशीं मीं भांडलों

ह्या मूर्ख पोरीसाठीं तिच्याशीं विनाकारण भांडण केलें.

**वामन**—त्याची हरकत नाहीं. त्यांचीं कुळें त्यांच्याशीं थोडीं भांडतात? पण शेवटीं त्या त्यांच्याशीं जुळवून घेतात. तसेंच तुमचेंहि जुळून जाईल. (बोटानें दाखवून) त्या **पार्वतीबाई** चालल्या आहेत. त्यांना आतां बोलावून आणतों. (**वामन पार्वतीबाईस** बोलावून आणतो)

(**वामन** आणि **पार्वतीबाई** येतात)

**वामन**—पार्वतीबाई, दादांच्या हातून चूक झाली त्याची ते माफी मागताहेत.

**पार्वतीबाई**—त्या भांडीवांश्या हरकामीजवळ त्यांना माफी मागूं दे. माझ्या जवळ कशाची माफी मागताहेत?

**रामजी**—पार्वतीबाई, असा राग करावा हा शेजारधर्म नाहीं. माणसाच्या हातून चूक ही होतच असते. तुह्मीं एकदम येऊन रागावलांत ह्मणून कमी जास्ती शब्द तोंडांतून गेला असेल.

**पार्वतीबाई**—पुरुषांना आपला सुमार राहतो कुठें? मेली कुणबीण दिसली कुणबीण!

**वामन**—जाऊं द्या हो पार्वतीबाई, तें मनांतच आणूं नये. चूक ही मनुष्याजवळून होतच आहे. मोठ्या मनुष्यानें मनाहि मोठें करावें? आतां तुह्मीं पहिल्यापेक्षां

दसपट मोठी झालांत. आतां पहिल्यापेक्षां दसपट मोठें मन करावें.

**रामजी**—( एकीकडेस ) हा सांगणार आतां हिला!

**पार्वतीबाई**—पहिल्यापेक्षां दसपट मोठी झालांत? ह्मणजे काय?

**वामन**—ह्मणजे काय! तें लक्ष्मीजवळचें सोडतीचें टिकिट नाहीं घेतलें तुह्मीं!

**पार्वती**—हो, घेतलं मग?

**वामन**—त्याला दहा हजार रुपयांचें बक्षीस आलें आहे.

**पार्वती**—काय ह्मणतोस काय?

**वामन**—दहा हजाराचें बक्षीस आलें ह्मणून ह्मणतों ना?

**पार्वती**—छेः, खोटें असेल तें.

**वामन**—खोटें? दादांना विचारां ना? तुमच्याशीं आतां पाट लावणार ते. ते तर नाहीं तुह्माला फसविणार?

**रामजी**—**पार्वतीबाईला** फसविणार? झालें तें झालें. आतां त्यांच्या वचनांत वागणार. त्यांना बक्षीस मिळालें आहे खरें, पण मला त्याशीं काय करावयाचें आहे? **पार्वतीबाई**जवळ पहिल्यानें बोललों तेंच खरें.

**पार्वती**—**रामजीदादा**, अरे **वामन**, मला कोणी तरी धरा. घेरी आली मला, पडेन खालीं मीं आतां.

वामन—पार्वतीबाईला हर्षवायू झालासा दिसतो !

पार्वती—हर्षवायू? मेला दुःखवायू, संतापवायू झाला ह्मणून ह्मण ना ? जळो मेली माझी हाव !

रामजी—म्हणजे काय? ह्मणजे काय ह्मणतां पार्वतीबाई ?

पार्वती—अहो, जळ्ळी अभाग्यी मीं. मीं तें टिकिट लक्ष्मीच्या नारायणाला विकलें.

रामजी—विकलें ?

वामन—(खोकखेत हंसून) हाः! हाः! हाः! काय गम्मत झाली. खूप मजा उडाली. पार्वतीबाई, आतां तुह्मीं नारायणाशीं पाट लावा.

रामजी—काय दुर्दैव हें !!

पार्वती—मला काय बरें बक्षीस येईल हें माहीत? लक्ष्मीजवळून घेतलें तिच्या व्याजाच्या पैशांत, आणि नारायणानें दिले दोन रुपये म्हणून त्याला विकलें.

रामजी—पार्वतीबाई, भारी तुम्हांला पैशाची हाव, त्याचा हा परिणाम. आज नाहीं तर दहा हजार रुपये तुम्हांला मिळते. नशीब तुमचें !

(रामजी घरांत जातो )

वामन—(हांसत ) हाः हाः हाः, माझ्या हयातींत असा गमतीचा दिवस गेला नाहीं ! काय गम्मत ही !!

**पार्वतीबाई**—काय मेलें फुटकें नशीब माझें!

**वामन**—पार्वतीबाई, बायकांचें नशीब कधीं फुटकें नसतें. पुरुषाच्या नशीबावर त्यांचें नशीब अवलंबून असतें. नारायणाशीं पाट लावा ह्मणजे ते दहा हजार रुपये तुमचेच आहेत.

**पार्वतीबाई**—इश्श! त्या मजुराशीं?

**वामन**—तो गिरणींत मुकादम असतो. त्याला कारकुनापेक्षां जास्ती पगार मिळतो.

**पार्वती**—असें काय? मी समजत होतें कां तो दिवस मजुरीवर काम करितो.

**वामन**—आणखी आतां दहा हजार रुपये हातांत आल्यावर तो गिरणींत जाईल कशाला? येथेंच घरदार घेऊन सावकारी नाहीं करणार?

**पार्वती**—तो धंदा करूं लागला मग त्याला कोण काय ह्मणणार आहे? तो घरची गाडी घोडा सुद्धां ठेवील.

**वामन**—तुमचा दोघांचा पैसा एक झाला तर गाडी घोडा ठेवितां येईल. नाहीं तर काय ठेवितो एकट्याच्या पैशांत?

**पार्वती**—तें तर खरेंच, तें तर खरेंच. तो आज सकाळीं माझ्या घरीं आला होता. आतां पहिल्यापेक्षां दिसतोहि बरा.

**वामन**—आतां तर दहा हजारपट चांगला दिसेल. ( एकीकडेस ) **पार्वतीबाईच्या** मनांत येत चाललें आहे, जर ह्यांचें जुळत आलें तर लक्ष्मीची अशी करीन फजिती? ( उघड ) आज तुमच्या येथून आला कीं नाहीं तेव्हां माझ्याजवळ त्यानें काढली होती हीच गोष्ट.

**पार्वतीबाई**—( हलकें ) खरेंच कारे **वामन**?

**वामन** तो **नारायणच** येतो आहे पहा. पहा कसा योग आला आहे तो!

( **नारायण** येतो )

**नारायण**—**पार्वतीबाई,** अजून येथेंच अहांत? घरीं नाहीं गेलांत? मीं तुमच्याकडेच जात होतों.

**पार्वती**—चला येतेंच मीं घरीं आतां.

**वामन**—कशाला घरीं जातां? येथेंच होऊंद्याना नक्की?

**पार्वती**—**वामन,** तूं भारीच चावट आहेस, कांहीं न् कांहींच बोलतोस,

**वामन**—कांहीं न् कांहींच कशाचें बोलतों? मनासारखें बोलतों आहे ना? बरें चला तुमच्या ओटीवर.

( **पार्वतीबाईच्या** ओटीवर जातात )

**नारायण**—( एकीकडेस ) हा काय दोघांचा बेत चालला आहे बरं!

**वामन**—चला होऊं द्या नक्की आतां. उशीर

कशाला? अशा कामांत 'शुभस्य शीघ्रं' हें लक्षांत ठेवावें. **पार्वतीबाईच्या** मनांत **नारायणा**शीं पाट लावायाचा आहे आणि **नारायण** सकाळपासून येजा करितो आहे, तें मला माहीत आहे, आतां कां उशीर? होऊं द्या एकदां नक्की.

**पार्वती**—(मान खालीं घालून) **वामन**, काय हें बोलतोस? कोणी ऐकेलना?

**वामन**—ऐकेना कोणी? खऱ्याला काय भीति आहे? तुम्हां दोघांच्या मनांत असल्यावर तुमचा कोणी मालक आहे?

**नारायण**—पार्वतीबाई मजसारख्या गरीबाबरोबर पाट लावणार? (एकीकडे) दिसतें आहे खरें हिच्या मनांत. जमेल हें तर मग आणखी काय पाहिजे? हिची देवघेव किती आहे? घर कसें लहानसें टुमदार आहे? (उघड) **वामन**, हें भलतेंच काय बोलतोस? माझ्या आणि **पार्वतीबाईच्या** स्थितींत फेर किती!

**वामन**— आतां फार नाहीं राहिला. त्यांचे सात आठ हजार मुळचे आहेत, आणि तुझे दहा हजार. सारा फेर दोन तीन हजारांचा.

**पार्वती**—(एकीकडे) सांगणार मला हा आतां ह्याला.

**नारायण**—म्हणजे काय म्हणतोस **वामन**? माझे दहा हजार कशाचे?

**वामन**—कां, पार्वतीबाईजवळचें सोडतीचें टिकिट तुझ्याजवळ नाहीं? विकलेंस कीं काय कोणाला? हें टिकिट पृथ्वीप्रदक्षणेला निघालेलें दिसतें. त्या टिकिटाला दहा हजार रुपये बक्षीस आले आहेत.

**नारायण**—म्हणतोस काय वामन?

**वामन**—दहा हजार रुपये मिळणार तुला टिकिट विकलें नसलें तर!

**नारायण**—हें टिकिट मजजवळ आहे. विकायसाठीं कां दुप्पट किंमत देऊन मीं तें घेतलें?

**वामन**—( एकीकडे ) घमेंडीत आहे, पण होईल मजा पुढें.

**नारायण**—तर मग आतां लग्न लावण्यास हरकत नाहीं. दरिद्र गेलें. जोशाला आतां मुहूर्त पाहण्याला सांगतों. दोघांना अनकूळ असा मुहूर्त मिळाला पाहिजे. आतां जोशाकडे जातों.

( **नारायण** जातो. )

**पार्वती**—माझें मन अगदीं ठिकाणीं नाहीं आज. पुढची कांहीं तरी तयारी केली पाहिजे. जातें मीं आतां.

( **पार्वतीबाई** जाते. )

**वामन**—( हंसत ) हाः हाः हाः! कशीं बाहुलीं आहेत? जशीं मीं नाचवितों तशीं नाचताहेत. आतां

लक्ष्मीला रडवितों मीं. ह्यापासून मनाला पुरें समाधान झालें. ह्या जगांत कोणालाहि सुखी असण्याचें कारण नाहीं.

( **रामजी** येतो. )

**रामजी**—आतां मनाचा घोंटाळा कामाचा नाहीं. आतां मीं एकच निश्चय केला.

**वामन**—ता काय?

**रामजी**—पहिल्यापासून धारल्याप्रमाणें पार्वती-बाईशींच पाट लावायचा.

**वामन**—हा निश्चय जरा लवकर होण्याला पाहिजे होता. आतां नारायणाचें आणि पार्वतीबाईचें नक्की झालें!

**रामजी**—नारायणाचें आणि पार्वतीबाईचें नक्की झालें?

**वामन**—तो मुहूर्त सुद्धां पाहण्यासाठीं जोशाक-डे गेला.

**रामजी**—तरीच, आज सकाळीं उगीच नव्हता तिच्या मागल्या खोलींत गेला तो. बरें आतां काय बरें करावें?

**वामन**—आतां दोन घटका स्वस्थ जाऊन निजावें.

**रामजी**—हेंच खरें.

( **रामजी** जातो )

**वामन**—अजून ह्याचें मन **पार्वतीबाईवर** आणि डोळा तिच्या भांडवलावर आहे. पण भली गुलामाची निराशाकरून टाकली. शाबास **वामन**, शाबास.

( **लक्ष्मी** येते )

**लक्ष्मी**—**वामन**, **नारायणाला** पाहिलास का तो कुठें गेला तो ?

**वामन**—आतांच तो जोशाकडे गेला.

**लक्ष्मी**—जोशाकडे कशाला ?

**वामन**—लग्नाला मुहूर्त पाहण्याला.

**लक्ष्मी**—लग्नाला मुहूर्त पाहण्याला ?

**वामन**—हो लग्नाला मुहूर्त पाहण्याला. तुझें सोडतीचें टिकिट त्यानें **पार्वतीबाई** जवळून घेतलें, त्याचे त्याला दहा हजार रुपये मिळणार ह्मणून—

**लक्ष्मी**—त्याला दहा हजार रुपये मिळणार ? जाऊं दे तर त्याला भेटूं दे.

**वामन**—थांब, येवढ्यांत कशाला भेटतेस ? त्याच्या लग्नाच्यावेळीं आहेरच घेऊन जाना ? ह्मणजे त्याला अधिक आनंद होईल.

**लक्ष्मी**—लग्न कोणाशीं लावणार ?

**वामन**—अग चुकलों, लग्न नाहीं, पाट, तो **पार्वतीबाईशीं** पाट लावणार.

**लक्ष्मी**—**पार्वतीबाईशीं** पाट लावणार ? अरे

**नारायण**, माझ्याशीं येवढें बेइमान? बरें जाऊन त्याची फजेती करतें.

**वामन**—कां बरें? तूं नाहीं त्याच्याशीं बेइमान केलेंस? त्याला विसरून वकिलाशीं लग्न लावायला कशी कबूल झाली होतीस?

**लक्ष्मी**—तें पण खरेंच. त्याची फजेती करायाला गेलें तर तोच मला हिणावील. बरें तर, मला खण चोळी मिळेल ती घेऊन जाऊन आहेरच करीन.

( **लक्ष्मी** जाते )

**वामन**—( हंसत ) हा: हा: हा:! गरीब बिचारी **लक्ष्मी**! कशी निराश झाली आतां! हा तो **नारायण** येतो आहे.

**वामन**—कां मुहूर्त मिळाला?

**नारायण**—जोशी **लक्ष्मीची** जन्मपत्रिका मागतो आहे.

**वामन**—लक्ष्मीची जन्मपत्रिका कशाला? **पार्वती**बाईचीना?

**नारायण**—छे:, **पार्वतीबाईची**? मी **लक्ष्मीला** विसरेन काय?

**वामन**—( एकीकडेस ) अरे हें काय? ह्यापासून तर दोघेही सुखी होतील, आणि मग तर सारेंच बिघडून जाईल. ( उघड ) पण **लक्ष्मीच्या** मनांत आहे कां? ती तुला विसरून गेली असली तर?

**नारायण**—लक्ष्मी मला विसरून गेली?

**वामन**—तिनें आणि तिच्या आईनें वकिलाची मागणी कबूल केली तेव्हांच ती तुला विसरून गेली.

**नारायण**—वकिलाची मागणी कबूल केली?

**वामन**—विचार तिला नाहीं तर वकिलाला. माझ्या समक्ष नक्की झालें. आतां वकील नाकबूल जातो आहेसें दिसतें, ती गोष्ट निराळी.

**नारायण**—बेइमान! तर मग **पार्वतीबाईशीं** पाट लावून हिची खोड तोडतों. आधीं तें **पार्वतीबाईशीं** दुसरें काम आहे त्याचा निकाल करून घेऊं द्या.

( **नारायण पार्वतीबाईच्या** घरीं जातो )

**वामन**—( हंसत ) हाः! हाः! हाः! आजच्या गमती सारखी गम्मत आजपर्यंत झाली नाहीं.

( **रामजी** येतो )

**रामजी**—वामन, तूं **नारायणाला** पाहिलास कां कोठें?

**वामन**—तुमचें कुटुंब होणार होतें त्या **पार्वती-बाईची** जन्मपत्रिका घेण्यासाठीं तिच्या घरांत गेला आहे.

( **नारायण** आणि **पार्वतीबाई** येतात )

**नारायण**—**पार्वतीबाई**, ह्या जगांत इमान म्हणाल तर कसें तें राहिलेंच नाहीं.

**पार्वती**—( एकीकडेस ) **रामजीवकील** आले! त्यां

च्या देखत मी **नारायणाशीं** इतक्या सलगीनें काय बोललें? मला काय ते ह्मणतील? लाज वाटते बाई मला.

( **लक्ष्मी** येते )

**लक्ष्मी**—**वामन** मागल्या खोलीची किल्ली दे, मला तांदूळ सडायाला काढायाचे आहेत.

( **गांवकरी** येतात )

**गांवकरी**—**वामन**, सोडतीचे नंबरांत कोणा कोणाला बक्षीस मिळालें सांग?

**वामन**—जरा थांबा. **रामजी** वकिलाकडे कागद आला आहे त्यांत आपल्या गांवांत आलेल्या टिकिटां पैकीं एकच नंबराला बक्षीस आल्याचें लिहून आलें आहे. मीं इंदुप्रकाश आणायला मुद्दाम मुंबईस मनुष्य पाठविला आहे. कारण बाहेरगांवच्या वर्गणीदारांस ते कधीं कधीं दुसरे दिवशीं पाठवितात. तो आतांच्या गाडींत येईल. त्यांत आणखी कांहीं नंबर असले तर कळतील. इतक्यांत मला **नारायणाच्या** लग्नाची तयारी करूं द्या.

**पार्वती**—( एकीकडेस ) काय मेला द्वाड! साऱ्यांना सांगत बसला पहा!

**गांवकरी**—**नारायणाचें** लग्न होतें आहे? राम राम **नारायणराव** नवरदेव!

**नारायण**—मीं नाहीं नवरदेव. ते वकील नवरदेव होणार. त्यांना रामराम करा.

रामजी—मीं नवरदेव?

**नारायण**—कां लक्ष्मीला फसवायची कीं काय?

**रामजी**—लक्ष्मीला फसवायाची? कोण लक्ष्मीशीं लग्न लावणार, मीं? त्या दीडदमडीच्या मोलकरणीशीं?

**लक्ष्मी**—(एकीकडेस) आणि त्या चेड्मानी थेरड्याशीं लग्न लावणार मीं?

**नारायण**—वामनानें मला सांगितलें आहे कां तुमचें आणि लक्ष्मीचें नक्की ठरलें आहे.

**रामजी**—आणि त्यानें मला सांगितलें कां तुझें आणि पार्वतीबाईचें नक्की झालें आहे.

**लक्ष्मी**—(एकीकडे) मला पण मेल्यानें तसेंच सांगितलें.

**गांवकरी**—वामन, काय हे तंटे लावलेस?

**वामन**—मीं तंटे लावले? सारे त्या दहा हजार रुपायानें तंटे लावले.

**रामजी**—आणखी गुलाम फजेती करणार आतां.

**गांवकरी**—दहा हजार रुपये कशाचे?

**वामन**—अहो, तुह्मीं साऱ्यांनीं सोडतीचीं टिकिटें घेतलीं आहेत, तसें लक्ष्मीनें एक घेतलें होतें. त्याला दहा हजाराचें बक्षीस मिळालेलें कळतांच रामजीदादा लक्ष्मीशीं लग्न लावायला तयार झाले. पण लक्ष्मीनें तें टिकिट पार्वतीबाईला दिल्याचें कळलें, तेव्हां त्यांच्याशीं पाट लावायला तयार झाले. त्यांनीं टिकिट

**नारायणाला** विकलें, तेव्हां **पार्वतीबाई** त्याच्याशीं पाट लावायला तयार झाली आहेत. **लक्ष्मी रामजीशीं** लग्न लावणार होती ह्मणून **नारायण** पण **पार्वतीबाईशीं** पाट लावणार. ह्यांत झालें तें सर्व रितीचेंच झालें. **वामनानें** कशाचे तंटे लावले?

**गांवकरी**—मग आतां **नारायण पार्वतीबाईशीं** पाट लावणार?

**वामन**—मुहूर्ताची काय ती खोटी आहे. पण मी सांगणार होतों कां रुपये त्याच्या हातीं आधीं येऊं द्या.

**पार्वती**—( एकीकडेस ) रुपये येतील, ते कोठें जातात? उशीर केला तर त्याच्यावर कितीक जणींच्या उड्या पडतील.

**गांवकरी**—सोडतींत नंबर निघाल्यावर रुपये कोठें जातात? **सदाशिवराव गुप्त्याचे** चार महिन्यांनीं रुपये आले. बरें, तुझा इंदुप्रकाश कधीं येईल?

**वामन**—तो मनुष्य येतो आहेसें वाटते. हा तोच, आलाच तो. आण आण पाहूं इंदुप्रकाश!

**रामजी**—माझा नंबर चुकला आतां मला काय दुसरे नंबर असले तर करायाचें आहे! पण आतां येतात कुठले दुसरे नंबर?

**गांवकरी**—चे घे पाहूं तो इंदुप्रकाश?

( **वामन** इंदुप्रकाश फोडतो )

**गांवकरी**—पहा पहा, पाहा आमचे नंबर?

**वामन**—काढा काढा साऱ्यांचीं टिकिटें.

**एक गांवकरी—वामन,** माझा नंबर आधीं पहा. माझा दोनहजार तीनशें पंचेचाळीस आहे.

**दुसरा गांवकरी—वामन,** माझा आधीं पाहा. माझा दोन हजार तीनशें चाळीस आहे.

**दुसरे गांवकरी**—त्यांचे आधीं काय ह्मणून पाहणार? ज्याचे जशे ओळीनें येतील तसे पहा.

**नारायण**—माझापण नंबर त्यांत लिहिला आहे-ना पहा. नाहीं तर छापतांना चुकतात एकादे वेळेस.

**पार्वती—वामन,** आधीं तोच नंबर पहा.

**वामन**—( मोठ्यानें हंसून ) हाः! हाः! हाः! हें पहा काय? वाचा इंदुप्रकाश!

**"टाकळीची सोडत, मोठें ढोंग"**

"ही सोडत लबाडी असून लोकांना खोटे नंबर ते-थील लोक कळवितात." हाः! हाः! हाः! ह्या दहा हजार रुपये **नारायणराव** ह्यावा पाट **पार्वतीबाई** गिरणींतील मुकादमाशीं. हाः! हाः! हाः!

**पार्वती**—( एकीकडेस पण **वामन** ऐकतो ) काय मे-ले रुपायापरी रुपये गेले आणि साऱ्या गांवांत फजेती झाली तोंड काय मेलें दाखवूं आतां?

( **पार्वतीबाई** जाते )

**वामन**—( हंसत ) हाः! हाः! हाः!

**नारायण**—( एकीकडेस पण **वामन** ऐकतो ) आ-

तां **पार्वतीबाई** माझ्याशीं कशाचा पाट लावते! पण त्या **लक्ष्मीचें** मीं कधीं तोंड पाहणार नाहीं. आतांच्या गाडीला मुंबईस जातों निघून. ( **नारायण** जातो )

**वामन**—( हंसत ) हाः हाः हाः!

**लक्ष्मी**—( एकीकडेस पण **वामन** ऐकतो ) मेले कोणालाच रुपये मिळाले नाहींत. पण **नारायण** मात्र गेला हातचा. जाऊं द्या आपलीं भांडीं घासायाला.

( **लक्ष्मी** जाते )

**वामन**—( हंसत ) हाः हाः हाः!

**रामजी**—( एकीकडेस पण **वामन** ऐकतो ) पैशांत आणि लग्नांत आमच्यासारख्या तत्ववेत्त्यांना कांहीं वाटत नाहीं. एक फजेती झाली ती वाईट. दोन खटले जिंकले ह्मणजे भरून येईल ती. वकिलाच्या वर्तणुकीला कोण विचारितो? त्यानें कोडतांत हुशारी दाखविली ह्मणजे झालें. ( **रामजी** जातो )

**वामन**—( हंसत ) हाः हाः हाः!

**गांवकरी**—आपण नाहीं कधीं सोडतींत पैसे घालणार. आपले तेवढे पैसेच गेले, पण बरी ह्यांच्या-सारखी फजेती नाहीं झाली. ( **गांवकरी** जातात )

**वामन**—( हसत ) हाः हाः हाः! घ्या सोडतीचीं टिकिटें! घालवा पैसे! त्या शिवाय मला असा गमतीचा दिवस यायचा नाहीं. वाहवारे गम्मत! हाः हाः हाः!

( **वामन** जातो )

**समाप्त.**